

थेरगाव मध्ये दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार !

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in सोमवार दिनांक 28/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 166 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# पुन्हा ठाकरे बंधू एकत्र!



**मुंबई: शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रविवारी पुन्हा एकदा मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले. राज ठाकरे यांनी ' मातोश्री ' निवासस्थानी जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेवून शुभेच्छा दिल्या.**

या भेटीमुळे आनंद द्विगुणित झाल्याची प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. राज ठाकरे यांनीही समाजमाध्यमावर शुभेच्छा संदेश देत मोठे बंधू शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्याचे सांगितल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही भाऊ एकत्र येणार असल्याच्या जोरदार चर्चा रंगल्या.

हिंदी भाषा सक्तीविरोधातील शासन निर्णय रद्द झाल्यानंतर विजयी मेळाव्यात उद्धव ठाकरे व राज ठाकरे २० वर्षांनंतर पहिल्यांदा एकत्र आले. त्यानंतर पुन्हा एकदा आज या दोघांची भेट झाली. विशेष म्हणजे राज ठाकरे तब्बल सात वर्षांनी मातोश्री निवासस्थानी दाखल झाले व त्यांनी उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राज ठाकरे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या खोलीत जाऊन त्यांच्या आसनाला वंदन केले. दोघांमध्ये २० मिनिटे चर्चा झाली.

यावेळी व्यंगचित्रांवर चर्चा झाली व जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. दोन नेते नव्हे, तर दोन भाऊ भेटल्याची माहिती शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी दिली. उद्धव ठाकरे यांनीही या भेटीबद्दल आनंद व्यक्त करताना राज ठाकरे यांनी शिवसेना एकच असल्याचा मुद्दा मांडल्याचे नमूद केले.



# महिला अत्याचारात वाढ

## खा.सुप्रिया सुळेंची मित्र पक्षांवर नाराजी!

पुणे : 'महाराष्ट्रातील जनतेने विश्वासाने महायुती सरकारला प्रचंड बहुमत दिले. मात्र, देशपातळीवर राज्याची प्रतिमा डागाळली आहे. राज्यात दीडशे वर्षांत जे घडले नाही, ते १५० दिवसांत घडले आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती बिघडली असून, गुन्हेगारी, कौटुंबिक हिंसाचार, महिलांवरील अत्याचार, वाहतूककोंडी यांसारख्या घटनांमध्ये वाढ झाली आहे,' अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी महायुती सरकारवर केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील मित्र पक्षांवर नाराज असून, महाराष्ट्राची अब्रू वाचविण्याची वेळ आली असल्याचेही त्या म्हणाल्या.

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत सुळे बोलत होत्या. या वेळी शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी नगरसेवक सचिन दोडके आणि पदाधिकारी उपस्थित होते.

'बीडमधील सरपंच हत्या प्रकरण, महादेव मुंडे प्रकरण, लाडकी बहीण योजनेमध्ये भ्रष्टाचार, अधिवेशनादरम्यान सभागृहात कृषिमंत्री मोबाइलवर रमी खेळत असल्याचे चित्रीकरण, समाजकल्याण मंत्री खासगी हॉटेलमध्ये पैशाची बॅग घेऊन बसल्याचे प्रकरण, मंत्र्यांची बेताल वक्तव्ये, सरकारच्या थकीत देयकांमुळे कंत्राटदाराची आत्महत्या यांसारख्या घटना घडल्या आहेत. राज्याची देशपातळीवर बदनामी झाली आहे.'

'बीडमध्ये सरपंच संतोष देशमुख यांची अमानुष हत्या, महादेव मुंडे यांची हत्या या प्रकरणांमागे कोण आहे, हे सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांनी समोर आणले.

त्यातून अनेक दुर्दैवी घटना उघडकीस आल्या.

घरे, संसार उद्ध्वस्त झाल्याचेही उघड झाले. असे असताना सरकार या प्रकरणांच्या पाठीमागे असणाऱ्यांना 'क्लीन चीट' देत आहे, ही अत्यंत शरमेची बाब आहे,'

**खा.सुप्रिया सुळे**

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
सोमवार दिनांक 28/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक १४ येथे वृक्षारोपण व आकुर्डी मनपा रुग्णालय येथे रुग्णांना फळ वाटप कार्यक्रम करण्यात आला. उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस पिंपरी चिंचवड मधील शिवसैनिकांनी अनोख्या पद्धतीने सामाजिक वृक्षारोपण व रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करून केला.

यावेळी शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार, शिवसेना महिला संघटिका रूपाली आल्हाट, माजी नगरसेविका मीनल यादव, युवासेना प्रमुख चेतन अण्णा पवार, उपशहर प्रमुख अमोल निकम, युवराज कोकाटे, उद्योजक सोमनाथ दादा काळभोर, विभाग प्रमुख सतीश मरळ, गोविंदराव शिंदे, दीप्ती काळभोर ,सुमित निकाळजे यांच्या हस्ते वृक्षारोपण व फळ वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजन अमोल पुन्नासे कृष्णा माने प्रीतम तेलंग, जीवन वाघमारे, नवनाथ शिंदे, यज्ञेश वाघमारे, विशाल शिंदे, ओम मते यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन युवासेनेचे पिंपरी चिंचवड उपशहर प्रमुख निखिल उमाकांत दळवी यांनी केले होते.





# लहान भावाचा खून करणारा आरोपी कर्वेनगरमधून अटक

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




**पुणे : ताम्हिणी घाटात बेवारस अवस्थेत सापडलेल्या तरुणाच्या खुनाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणात वारजे माळवाडी पोलिसांनी खून झालेल्या तरुणाच्या मोठ्या भावाला अटक केली आहे. व्यसनांच्या आहारी गेलेल्या लहान भावाशी झालेल्या वादातून त्याचा खून करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.**

ऋषिकेश अनिल शिर्के (वय २३, रा. गायकवाड चाळ, मावळे आळी, कर्वेनगर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी ऋषीकेशचा मोठा भाऊ अनिकेत अनिल शिर्के (वय २६) याला अटक करण्यात आली. शनिवारी सकाळी ताम्हिणी घाटात बेवारस अवस्थेत एका तरुणाचा मृतदेह सापडल्याची माहिती पौड पोलिसांना मिळाली हो ेती.खून झालेल्या तरुणाची ओळखही पटलेली नव्हती.

पौड पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत होता. आरोपी अनिकेतने लहान भाऊ ऋषीकेश याचा ताम्हिणी घाटात खून केल्याची माहिती वारजे माळवाडी पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक सचिन तरडे यांना खबऱ्याने दिली.

त्यानंतर पोलिसांच्या पथकाने अनिकेतचा शोध घेण्यास सुरुवात केली.अनिकेत हा कर्वेनगरमधील वनदेवी मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या टेकडीच्या परिसरात लपून बसला होता.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने लहान भावाचा खून केल्याची कबुली दिली.अनिकेत आणि ऋषिकेश शुक्रवारी (२५ जुलै) रात्री कर्वेनगर येथून दुचाकीवरून रत्नागिरीतील लांजा तालुक्यातील गोळवशी-शिर्केवाडी येथे देवदर्शनासाठी निघाले. दोघे मध्यरात्री ताम्हिणी घाटातील गोणवडी गावाजवळ थांबले.

ऋषिकेशला दारू आणि गांजाचे व्यसन होते.

अनिकेतने ऋषीकेशला व्यसन सोडण्यास सांगितले. या कारणावरुन दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर रागाच्या भरात अनिकेतने ऋषीकेशनवर तीक्ष्ण शस्त्राने वार केले.

# मराठी पत्रकार संघ तर्फे रविवारी नेत्रचिकित्सा शिबिर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड मराठी पत्रकार संघ आणि ईशा नेत्रालय पुणे विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवार दि. 3 ऑगस्ट रोजी पिंपरी चिंचवड मधील पत्रकार व कुटुंबियांसाठी मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पत्रकार संघाचे शहराध्यक्ष नंदकुमार सातुर्डेकर यांनी दिली.

रविवार दि. 3 ऑगस्ट रोजी दुपारी दोन ते सायंकाळी पाच या वेळात ईशा नेत्रालय, प्रीमियर प्लाझा, बिग बजार, पहिला मजला, कार्निवल सिनेमाच्या बाजूला जुना पुणे मुंबई महामार्ग चिंचवड स्टेशन येथे हे नेत्रचिकित्सा शिबीर होणार आहे. नेत्रचिकित्सा शिबिराचे उद्घाटन ईशा नेत्रालयाचे पुणे ब्रांच इन्चार्ज दीपक कदम यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी आधुनिक पद्धतीने नेत्र तपासणी करण्यात येणार असून त्याबरोबरच डोळ्यांचे आजार तसेच डोळ्यांची काळजी कशी घ्यावी याबाबत डॉ. वैभव अवताडे,डॉ. जयशील नाझरे मार्गदर्शन करणार आहेत. नेत्रालयाचे मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह यशवंत बो-हाडे यांचे शिबिरासाठी विशेष सहकार्य लाभले असल्याची माहिती सातुर्डेकर यांनी दिली.



# पतीने पत्नीवर चाकूने हल्ला करत केला खून

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे - शहरातील विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत आज (२७ जुलै २०२५) दुपारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. खांदवे चाळ, खांदवे नगर या ठिकाणी एका पतीने पत्नीवर चाकूने हल्ला करून तिचा जागीच खून केल्याची घटना घडली. ममता प्रेम चव्हाण (वय अंदाजे ३० वर्षे) असे मृत महिलेचे नाव आहे.




ममता ही काही दिवसांपासून आपल्या मावशी रेशमा रामेश्वर जाधव यांच्याकडे खांदवे नगर येथे राहत होती. ममता हिचे पती प्रेम चव्हाण (रा. सोलापूर) याच्याशी सतत घरगुती कारणांवरून वाद होत होते. त्यामुळे ती माहेरी न जाता मावशीकडे राहत होती.

रविवारी दुपारी ३ ते ३.३० च्या सुमारास प्रेम चव्हाण हा अचानक तिच्या राहत्या घरी येऊन, तिच्याशी काही वेळ वाद घालून चक्क चाकूने गळ्यावर वार केला आणि घटनास्थळावरून फरार झाला. या हल्ल्यात ममता चव्हाण हिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच विमानतळ पोलीस स्टेशनचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून काही तासांतच आरोपी पती प्रेम चव्हाण याला शोधून काढले आणि ताब्यात घेतले.

# वडिलांचे मोल, कुटुंबाचे खंबीर बळ - शत्रुघ्न काटे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

निगडी,रावेत, पुनावळे आणि बालेवाडी या भागातील विद्यार्थ्यांसाठी Cambridge International स्कूल आणि CHAMPS यांच्या संयुक्त विद्यमाने ग.दि.माडगूळकर सभागृह,निगडी प्राधिकरण याठिकाणी आयोजित करण्यात आलेला ‘Happy Father's Day’ विशेष कार्यक्रम अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून "शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापु) काटे" उपस्थित होते.



शत्रुघ्न काटे यांनी कार्यक्रमात बोलताना सांगितले की, “वडिलांचे मोल केवळ आर्थिक आधारापुरते नसून,ते कुटुंबाचे खंबीर बळ असतात.शाळांनी अशा उपक्रमांद्वारे पालकांचा सन्मान आणि विद्यार्थ्यांच्या भावना जपल्याबद्दल कौतुक करावं लागतं.”

फादरस् डेच्या निमित्ताने आयोजिलेला हा भावनिक आणि प्रेरणादायी कार्यक्रम उपस्थित सर्वांच्या मनाला स्पर्श करून गेला. यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ.धनंजय वर्नेकर, संचालक श्रीमती शीतल धनंजय वर्नेकर,उद्योजक विरेंद्रसिंह शितोळे,चेतन भुजबळ,सौ. सोनाली कुटे (HOD,CHAMPS),सौ सविता चौधरी,सौ.विमला चौधरी,सौ.रोहिणी सहारे,सौ. तृप्ती घाडगे,श्री.सिद्धांत माने तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# थेरगाव मध्ये दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार !



>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरातील थेरगाव परिसरात असलेल्या मोरया बँक्वेट हॉल येथे, सालाबादप्रमाणे यंदाही इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या थेरगाव परिसरातील सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ माजी नगरसेवक अभिषेक बारणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित राहून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून गौरव केला.**

याशिवाय या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्राचेही आयोजन करण्यात आले होते. हरिश्चंद्र थोरात,रोहित कोटकर, प्रियंका जाधव, निकिताताई शिर्के, रेखा राठोड या विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थ्यांना उत्तमरित्या आगामी शैक्षणिक वाटचालीसाठी व करिअर बाबत मार्गदर्शन केले. पुढील शैक्षणिक वाटचालीत योग्य दिशा निवडण्यासाठी आणि विविध क्षेत्रातील संधींचा वेध घेण्यासाठी हे मार्गदर्शन निश्चितच विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल.

यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, त्यांच्यामध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होते. शिवाय समाजात शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण तयार होते, असे मत यावेळी व्यक्त केले. तसेच, थेरगाव परिसरातील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यासोबतच, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून करिअर मार्गदर्शन करण्याचा स्तुत्य उपक्रम आयोजित केल्याबद्दल अभिषेक बारणे व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करत कौतुक केले.

यावेळी निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, मा.नगरसेवक सिद्धेश्वर बारणे, तानाजी बारणे, मा.नगरसेविका मनीषाताई पवार, प्रमोद पवार, मंडल अध्यक्ष सनी बारणे, मा.स्वीकृत सदस्य संदीप गाडे, सोनालीताई गाडे, प्रज्ञाताई बारणे, करिष्माताई बारणे, सीमाताई चव्हाण, हरीश मोरे, संजय गांधी योजनेचे नरेंद्र माने, रवी भिलारे, आप्पा ठाकर यांच्यासह इत्यादी मान्यवर सहकारी, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काही पत्रकारांचे काम वाखाणण्याजोगे - ॲड.गौतम चाबुकस्वार



>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. मात्र या चौथ्या स्तंभावर बंधने वाढत आहेत. गोदी मीडिया म्हणून त्याला हिनवले, संबोधले जात आहे. याही परिस्थितीत कोणाचाही मुलाहिजा न ठेवता निर्भीडपणे पत्रकारिता करणारे , सत्तेला प्रश्न विचारणारे नंदकुमार सातुर्डेकर यांच्यासारखे पत्रकार दीपस्तंभासारखे असल्याचे प्रतिपादन पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार यांनी येथे केले.**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विजयनगर काळेवाडी येथील कारवार कोकण समाज हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात मराठी पत्रकार संघाच्या शहर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नंदकुमार सातुर्डेकर यांचा तसेच विविध क्षेत्रातील विविध क्षेत्रातील सविता जाधव शोभा धावटे, डॉ. अलवी सय्यद नासेर इब्राहिम, डॉ राजेंद्र किरके, रितू पसरीचा, विजयश्री काजळे, डॉ. संजय मांडलिक, डॉ. पियुशा कडूस , गीता जोशी, रणदिवे सर, रवींद्र फडतरे, डॉ. अभिजीत शेखर, संजय गायखे, प्रकाश तांबोरे, डॉ. प्रकाश जाधव, डॉ. भूषण ढालपे, अनिकेत वढणे, वैष्णव जाधव, राज नखाते, जया चासकर या मान्यवरांचा,अनुष्का येळवे सृष्टी पवार श्रेया अलर, सार्थक आहेर या खेळाडूंचा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा माजी आमदार ॲड.गौतम चाबुकस्वार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी संयोजक शिवसेना विधानसभा प्रमुख हरेश नखाते, शिवसेना काळेवाडी विभाग संघटिका सुजाता नखाते, महिला शहर संघटिका रूपाली आल्हाट, शिवसेना जिल्हा समन्वयक सुशीला पवार, वैभवी घोडके,उपजिल्हाप्रमुख दस्तगीर मणियार, गोरख पाटील, संवाद व्यासपीठचे हरीश मोरे, ह्यूमन राइट्स संघटनेच्या अनिता वर्मा, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ॲड चाबुकस्वार म्हणाले की, नुसते जगण्यात काही अर्थ नाही. सतत काहीतरी वेगळे सामाजिक काम करायला हवे. पुरस्कारांमुळे चांगले काम करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळते असे ते म्हणाले. सत्काराला उत्तर देताना सातुर्डेकर म्हणाले की, कोणत्याही क्षेत्रात काम करणारी व्यक्ती कोणीतरी आपला सत्कार करावा म्हणून काम करत नाही. तर त्या कामातून मिळणारा स्वानंद हीच त्याची प्रेरणा असते. पण कोणीतरी पाठीवर थाप मारली की केल्या कामाचे चीज झाल्यासारखे वाटणे हा मानवी स्वभाव आहे. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला त्यांचा उल्लेख करून ते म्हणाले की, भारतीय संस्कृती ही ज्ञानाची उपासना व गुणांची पूजा करणारी संस्कृती आहे. मात्र केवळ गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांनी सामान्यज्ञान,इंग्रजी, हिंदी, परदेशी भाषांचे ज्ञान आत्मसात करायला हवे. ए आय सारख्या तंत्रज्ञानाचा मुकाबला करण्यासाठी आपण परिपक्व व्हायला हवे असे सातुर्डेकर म्हणाले. सुजाता नखाते यांनी प्रास्ताविक केले. गोरख पाटील यांनी सूत्रसंचालन केले. हरेश नखाते यांनी आभार मानले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968